## कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

कार्यासन - ३०

**विषय : मा. मंत्री ( कामगार ) यांच्या अध्यक्षतेखाली दालन क्रमांक - २०७, मंत्रालय येथे दिनांक ३०.०७.२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम. १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. भास्कर जाधव. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दालन क्रमांक-२०७. मंत्रालय येथे दिनांक ३०.०७.२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम. १९९६ अंतर्गत तज्ञ समितीच्या आयोजित केलेल्या बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. अरविंदकुमार (भा.प्र.से.) | प्रधान सचिव. (कामगार) महाराष्ट्र राज्य. मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| २. | मा. श्री. एच.के. जावळे (भा.प्र.से.) | कामगार आयुक्त. महाराष्ट्र राज्य. मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ३. | श्री. भु.मृ. गुरव | सहसचिव. विधी व न्याय विभाग. मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ४. | श्री. मोरे | संचालक. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय. मुंबई. तथा सदस्य तज्ञ समिती |
| ५. | श्री. आसिफ उ. कासकर | सदस्य तज्ञ समिती. मुंबई |
| ६. | श्री. भरमा कांबळे | सदस्य तज्ञ समिती. कोल्हापूर |
| ७. | श्री. दादाराव डोंगरे | सदस्य तज्ञ समिती. मुंबई |
| ८. | श्री. मुस्ताक अब्दुल्ला दळवी | सदस्य तज्ञ समिती. मुंबई |
| ९. | श्रीम. निलांबरी भोसले | सहायक कामगार आयुक्त. मुंबई तथा सदस्य-सचिव. तज्ञ समिती. |

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदय यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

**मुद्दा क्र. १ : दि. ९.६.२०१४ रोजी झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.**

(१) सदस्य श्री. डोंगरे यांनी दिनांक ०८.१०.२०१३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करावयाचे राहिले असल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०९.०६.२०१४ रोजीच्या बैठकीत कायम करण्यात आले आहे म्हणून दिनांक ०९.०६.२०१४

राजांच्या बैठकांच्या इतिवृत्तांबाबतची चर्चा आता करता येईल असेही त्यांनी सांगितले. त्यानुसार मा. कामगार आयुक्त यांनी मागील बैठकीत चर्चा झालेल्या विषयाची सर्व सदस्यांना थोडक्यात माहिती दिली. सर्व सदस्यांनी इतिवृत्तावर चर्चा करुन मागील बैठकांच्या इतिवृत्तांतास मंजूरी देण्यात आली..

(२) तसेच श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी असे सांगितले की, नोंदित बांधकाम कामगारांना रु. ३०००/- रक्कम देणे ऐवजी ५ भेटवस्तु देण्यात याव्यात. यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, प्रत्येक ठिकाणच्या लोकांच्या गरजा व पसंती वेगवेगळया असतात. त्यामुळे मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या वस्तु त्यांच्या पसंतीस उतरतीलच असे नाही. याउलट सदर वस्तु खरेदीसाठी रोख रक्कम दिल्याने ते आपल्या पसंतीच्या वस्तु खरेदी करु शकतील, असा विचार करुन सदर प्रस्ताव शासनास पाठविला होता व त्यानुसार शासनाकडून मंजूरी देखिल मिळाली असुन शासन निर्णय दिनांक २६.०५.२०१४ निर्गमित झाला आहे. सदर रक्कम वाटपाचे काम जिल्हास्तरावरुन चालू असल्याचेही मा. कामगार आयुक्तांनी स्पष्ट केले. यावर चर्चा होऊन शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

(३) श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी नियम ३३ मध्ये सुधारणा करीत असताना कामगार संघटनेस ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याबाबतचे अधिकार इतर राज्यांनी दिलेले असल्यामुळे महाराष्ट्रातही अधिकार संघटनेस देण्यात यावे असे प्रतिपादन केले. यावर श्री. गुरव, सदस्य तज्ञ समिती तथा सह सचिव, विधी व न्याय विभाग यांनी असे नमूद केले की, गुजरात उच्च न्यायालयाने निर्णयात असे म्हटले आहे की, संघटनेच्या उद्देशांमध्ये अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्याची तरतूद नसल्यामुळे संघटनेस असे अधिकार देता येणार नाहीत. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, संबंधित स्थानिक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याबाबतचे नियम ३३ मध्ये प्रस्तावित सुधारणा शासनाकडे दिनांक २०.०६.२०१४ च्या पत्रान्वये यापूर्वी पाठविलेली आहे व त्यानुसार कार्यवाही करणे योग्य राहिल असे प्रतिपादन केले. तसेच संघटनेने कामगारांची यादी संबंधित स्थानिक प्राधिकरण व कामगार अधिकारी यांच्याकडे द्यावयाची असून त्यानुसार प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यास्तव कामगार अधिकारी प्रयत्न करतील असे सांगितले. यावर चर्चा होऊन त्यानुसार कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले

(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मधील नियम ४२ मध्ये गणपुर्तीबाबत सुधारणा करु नये असे श्री. डोंगरे यांनी नमूद केले याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, मंडळाचे कामकाज नियमित होण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रतिनिधी, कामगार प्रतिनिधी व मालक प्रतिनिधी यांचा प्रत्येकी किमान १ प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक होते. तथापि, अशासकीय सदस्य अस्तित्वात नसताना सदर गणपुर्ती नियमामुळे मंडळाची बैठक घेता येत नाही. अशासकीय सदस्यांची पदे रिक्त असल्यास शासनाचे अधिकारी शासनाच्या एकुण अधिकाऱ्यांपैकी १/३ अधिकारी उपस्थित असतील तर बैठक घेण्यास हरकत नसावी, अशा सुधारणा प्रस्तावित केल्याचे सांगितले. श्री. डोंगरे, तज्ञ समिती सदस्य यांनी सदर प्रस्तावास विरोध दर्शवित सध्या मंडळ कायम झाले असल्याने नियम दुरुस्ती करण्याची गरज नाही असे सांगितले. यावर भविष्यात या प्रकारची परिस्थिती उद्भवू नये म्हणून सदर नियमात दुरुस्ती करणे गरजेचे असल्याचे मा. कामगार आयुक्तांनी स्पष्ट केले.

(५) मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेली जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजना दिनांक ०९.०६.२०१४ रोजी बैठकीत ठरल्यानुसार रद्द न करता सदर योजनेस मुदत वाढ देण्यात यावी असे श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी सांगितले. तसेच सदस्य श्री. कांबळे यांनीही विमा योजनेच्या नुतनीकरणास सहमती दर्शविली. यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनेबाबत शासनाने व कॅगने गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. शासनाने असा आक्षेप घेतलेला आहे की, मंडळाने ई-निविदा न काढता न्यु इंडिया ॲश्युरन्स या विमा कंपनीची कोटेशनद्वारे निवड केली आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत वेगळ्या योजना असतानाही आणि शासनाची राजीव गांधी जीवनदायी योजना असतानाही सदर विमा योजना का लागू करण्यात आली, याबाबतचा खुलासा कामगार आयुक्त यांच्याकडून शासनाने मार्गाविण्यात आला आहे. तसेच कॅगने या विमा योजनेबाबत गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. कॅगचा आक्षेप असा आहे की, मंडळाने भरलेले रु. ३७ कोटींचे प्रिमियम विचारात घेता कामगारांना अत्यल्प लाभ मिळालेले आहेत. Cost Benefit Ratio अत्यंत कमी आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत समांतर योजना असताना सदर विमा योजना घेण्याची गरजच काय होती ? विमा योजने अंतर्गत मिळालेले लाभ विचारात घेता मंडळाने केलेल्या रु. ३७ कोटीचा खर्च वाया गेला आहे, असा आक्षेप कॅगने घेतलेला आहे.

शासनाच्या पत्रानुसार या योजनेबाबत मागविलेला अहवाल मंडळाचे अध्यक्ष तथा कामगार आयुक्त यांनी त्यांचे पत्र दिनांक २४.०७.२०१४ अन्वये शासनास सविस्तर अहवाल पाठविलेला आहे. असे कामगार आयुक्त यांनी प्रतिपादन केले. तसेच आतापर्यंत विमा कंपनी अंतर्गत सुमारे ३.५ कोटींचा लाभ झालेला आहे असे कामगार आयुक्त यांनी प्रतिपादन केले. तसेच कामगार आयुक्त यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती तत्कालीन आयुक्त यांनी निविदा काढून १ वर्षासाठी केलेली आहे. तथापि, न्यु इंडिया ॲश्युरन्स विमा कंपनीची निवड शासनाच्या धोरणानुसार ई-निविदा न काढता कोटेशनद्वारे केलेली आहे. यावर श्री. डोंगरे यांनी आतापर्यंत विमा कंपनीमार्फत सुमारे ४ कोटींचा लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. तसेच विमा काढणे म्हणजे त्याचा लाभ मिळालाच पाहिजे असे नसते, असेही ते म्हणाले. यावर कामगार आयुक्तांनी असे सांगितले की, शासनाच्या धोरणानुसार १० लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रक्रियेसाठी ई-निविदा काढणे अत्यावश्यक आहे म्हणून सदर विमा योजना राबवायची असल्यास नव्याने ई-निविदा काढून विमा कंपनीची निवड करावी लागेल, असे कामगार आयुक्तांनी सांगितले. तसेच कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सध्याच्या विमा कंपनीने नुतनीकरणाचा प्रस्ताव दिला असून यावर्षी रु. ३७ कोटी ऐवजी रु. २० कोटींमध्ये सदरचे काम करण्याचे त्यांनी प्रस्तावित केले आहे. श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी असे सांगितले की, शासनाच्या उपक्रम असलेल्या चार विमा कंपन्या आहेत आणि या चारही विमा कंपन्यांकडून कोटेशन्स घेऊन विमा कंपनीची नियुक्ती केलेली आहे. कोटेशन्सद्वारे न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीची नियुक्ती केलेली आहे. आता न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीने सदर काम ३७ कोटी ऐवजी २० कोटींमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीस बांधकाम कामगारांच्या विमा योजनेबाबत १ वर्षाचा अनुभव आलेला आहे. नव्याने विमा कंपनी नियुक्त केल्यास परत त्या कंपनीस माहिती होण्यास वेळ लागेल. त्यामुळे या अनुभवी विमा कंपनीचे रु. २० कोटींच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, असे श्री. डोंगरे यांनी नमूद केले. तसेच सदस्य, श्री. भरमा कांबळे यांनी विमा योजनेचे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चांगले काम झालेले असल्यामुळे त्यांनी त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवाव्यात असे नमूद केले. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती निविदा काढून झालेली असल्यामुळे आणि त्यांच्या सल्ल्याने न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कन्सल्टंट L & G आणि न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीने दिलेल्या सुधारीत रु. २० कोटींच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी

असे बहुमताने ठरले. तसेच सदर योजना तात्काळ चालू करावी असे बहुमताने ठरले.

(६) मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की. आतापर्यंत मंडळाच्या योजनांचे विविध लाभ कामगारांपर्यंत पोहोचण्यास विलंब लागत होता. आतापर्यंत बांधकाम कामगारांचे विविध योजनांसाठी केलेले अर्ज जिल्हा कार्यालयाकडून विभागीय कार्यालयाकडे व विभागीय कार्यालयाकडून मंडळ मुख्यालयाकडे येत असत. मंडळ मुख्यालयातून अर्जाची पडताळणी करुन सदर योजनांच्या लाभाचे धनादेश मंडळ मुख्यालयाकडून विभागीय कार्यालयास व विभागीय कार्यालयाकडून जिल्हा कार्यालयास व तदनंतर संबंधित बांधकाम कामगारास अशा सदर प्रक्रियेत पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहचण्यास विलंब होत असे. त्यामुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सर्व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावरील कार्यालय प्रमुखांस अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव कामगार आयुक्तालयाकडून शासनास पाठविण्यात आला व त्यानुसार दिनांक १८.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्यास मान्यता देण्यात आल्याचे मा. कामगार आयुक्तांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. सदर निर्णयाचे सर्व उपस्थितांनी स्वागत केले.

(७) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी व मंडळाकडे अद्याप नोंदित न झालेल्या कामगारांना मंडळाकडे नोंदित होण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी तसेच मंडळाच्या कल्याणकारी योजनांची माहिती राज्यातील जास्तीत-जास्त बांधकाम कामगार, बांधकाम मालक, विकासक यांना होण्यासाठी शासन पत्र दिनांक २६.०५.२०१४ व दिनांक २०.०६.२०१४ अन्वये एकूण रु. २५ कोटींच्या जाहिराती करण्यासाठी शासनाने आदेश दिले असल्याचे मा. कामगार आयुक्तांनी उपस्थितांना सांगितले. त्यामध्ये शासन निदेशानुसार एस.टी. बसच्या पाठीमागे व दोन्ही बाजूस, बस स्टँड वरील होर्डींगसवर, बस स्टॉपवर, बेस्ट बसेस मधील एल.सी.डी. वर, मोबाईल व्हॅनद्वारे बांधकामाच्या ठिकाणी, इत्यादी माध्यमांद्वारे जाहिराती देण्यात आल्याचेही त्यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले. मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी योजनांची जाहिरात करणे आवश्यक असल्याचे सर्व सदस्यांनी मान्य केले व त्यानुसार या बाबीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच रु. ३०००/- च्या अर्थसहाय्य वाटपाबाबतच्या जाहिराती नव्याने विविध वर्तमानपत्रातून करण्यात याव्या असेही मंडळ सदस्यांनी सुचविले.

(८) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केरळ राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास भेट देवून राज्यातील कामकाज कसे चालते याचा अभ्यास केल्याचे मा. आयुक्तांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. केरळ हे राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमांची अंमलबजावणी करणारे सर्वात पहिले राज्य असून सदर राज्यात मंडळाच्या मुख्यालयाची ४ मजली इमारत व प्रत्येक जिल्हास्तरावर एक कार्यालय असल्याचेही त्यांनी सर्वांना सांगितले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळही बळकट करणे व पुरेसा अधिकारी व कर्मचारी वर्ग नियुक्त करणे देखील आवश्यक असल्याचे त्यांनी सर्व उपस्थितांस सांगितले. सर्व उपस्थितांनी त्यास सहमती दर्शविली.

(९) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अंतर्गतच्या दिनांक ०९.०६.२०१४ रोजीच्या बैठकीमधील गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी देण्यात येत असलेल्या रु. २५ हजारांच्या अर्थ सहाय्य योजनेत सुधारणा करुन सदर अर्थ सहाय्याची रक्कम रु. ७५ हजार करण्यात आल्याचे मा. कामगार आयुक्तांनी सर्व उपस्थितांस कळविले. सदर निर्णयाचे सर्व उपस्थितांनी स्वागत केले.

(१०) कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळाकडे येणारा निधी विचारात घेता मंडळावर लेखा अधिकारी तसेच हिशोब तपासणीस (Internal Auditor) असणे आवश्यक आहे. मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, निविदा काढून हिशोबासाठी C.A. firm ची नियुक्ती करावी तसेच वित्त विभागाकडून लेखा अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी किंवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून नियुक्ती करावी असे सर्वानुमते ठरले.

**वरीलप्रमाणे सर्व विषयांवर सखोल चर्चेअंती दिनांक ०९.०६.२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.**

**मुद्दा क्र. २ : आयत्यावेळचे विषय :**

(१) सदस्य श्री. डोंगरे यांनी कामगार संघटनांनी ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात यावेत असे प्रतिपादन केले तसेच त्यांनी बऱ्याच राज्यांमध्ये ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार कामगार संघटनांना दिल्याचे नमूद केले. यावर श्री. गुरव, सहसचिव, विधी व न्याय विभाग यांनी नमूद

केले की, गुजरात उच्च न्यायालयाने निर्णयात असे नमूद केले आहे की, संघटनेच्या उद्देशामध्ये अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्याची तरतुद नसल्यामुळे संघटनेस असे अधिकार देता येणार नाहीत असे प्रतिपादन केले. कामगार आयुक्त यांनी सांगितले की, गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित स्थानिक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याबाबत नियम ३३ मध्ये प्रस्तावित सुधारणा शासनाकडे दिनांक ३०.०६.२०१४ च्या पत्रान्वये यापूर्वी पाठविलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही करणे योग्य होईल असे सांगितले. तसेच संबंधित संघटनांनी कामगारांची यादी संबंधित स्थानिक प्राधिकरण व कामगार अधिकारी यांच्याकडे द्यावयाची असून त्यानुसार प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्यास्तव कामगार अधिकारी प्रयत्न करतील असे सांगितले. यास सर्व उपस्थितांनी संमती दर्शविली.

(२) मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेली जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजना दिनांक ०९.०६.२०१४ रोजी बैठकीत ठरल्यानुसार रद्द न करता सदर योजनेस मुदत वाढ देण्यात यावी असे श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी सांगितले. तसेच सदस्य श्री. कांबळे यांनीही विमा योजनेच्या नूतनीकरणास सहमती दर्शविली. यावर कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मंडळामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनेबाबत शासनाने व कॅगने गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. शासनाने असा आक्षेप घेतलेला आहे की, मंडळाने ई-निविदा न काढता न्यु इंडिया ॲश्युरन्स या विमा कंपनीची कोटेशनद्वारे निवड केली आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत वेगळ्या योजना असतानाही आणि शासनाची राजीव गांधी जीवनदायी योजना असतानाही सदर विमा योजना का लागू करण्यात आली. याबाबतचा खुलासा कामगार आयुक्त यांच्याकडून शासनाने मागविण्यात आला आहे. तसेच कॅगने या विमा योजनेबाबत गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. कॅगचा आक्षेप असा आहे की, मंडळाने भरलेले रु. ३७ कोटींचे प्रिमियम विचारात घेता कामगारांना अत्यल्प लाभ मिळालेले आहेत. Cost Benefit Ratio अत्यंत कमी आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत समांतर योजना असताना सदर विमा योजना घेण्याची गरजच काय होती ? विमा योजने अंतर्गत मिळालेले लाभ विचारात घेता मंडळाने केलेल्या रु. ३७ कोटीचा खर्च वाया गेला आहे, असा आक्षेप कॅगने घेतलेला आहे.

शासनाच्या पत्रानुसार या योजनेबाबत मागविलेला अहवाल मंडळाचे अध्यक्ष तथा कामगार आयुक्त यांनी त्यांचे पत्र दिनांक २४.०७.२०१४ अन्वये शासनास सविस्तर अहवाल पाठविलेला आहे, असे कामगार आयुक्त यांनी प्रतिपादन केले. तसेच आतापर्यंत विमा कंपनी अंतर्गत सुमारे ३.५ कोटींचा लाभ झालेला आहे असे कामगार आयुक्त यांनी प्रतिपादन केले. तसेच कामगार आयुक्त यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती तत्कालीन आयुक्त यांनी निविदा काढून १ वर्षासाठी केलेली आहे. तथापि, न्यु इंडिया ऍश्युरन्स विमा कंपनीची निवड शासनाच्या धोरणानुसार ई-निविदा न काढता कोटेशनद्वारे केलेली आहे. यावर श्री. डोंगरे यांनी आतापर्यंत विमा कंपनीमार्फत सुमारे ८ कोटींचा लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. तसेच विमा काढणे म्हणजे त्याचा लाभ मिळालाच पाहिजे असे नसते, असेही ते म्हणाले. यावर कामगार आयुक्तांनी असे सांगितले की, शासनाच्या धोरणानुसार १० लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रक्रियेसाठी ई-निविदा काढणे अत्यावश्यक आहे म्हणून सदर विमा योजना राबवायची असल्यास नव्याने ई-निविदा काढून विमा कंपनीची निवड करावी लागेल, असे कामगार आयुक्तांनी सांगितले. तसेच कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, सध्याच्या विमा कंपनीने नुतनीकरणाचा प्रस्ताव दिला असून यावर्षी रु. ३७ कोटी ऐवजी रु. २० कोटींमध्ये सदरचे काम करण्याचे त्यांनी प्रस्तावित केले आहे. श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी असे सांगितले की, शासनाच्या उपक्रम असलेल्या चार विमा कंपन्या आहेत आणि या चारही विमा कंपन्यांकडून कोटेशन्स घेऊन विमा कंपनीची नियुक्ती केलेली आहे. कोटेशन्सद्वारे न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीची नियुक्ती केलेली आहे. आता न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीने सदर काम ३७ कोटी ऐवजी २० कोटींमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीस बांधकाम कामगारांच्या विमा योजनेबाबत १ वर्षाचा अनुभव आलेला आहे. नव्याने विमा कंपनी नियुक्त केल्यास परत त्या कंपनीस माहिती होण्यास वेळ लागेल. त्यामुळे या अनुभवी विमा कंपनीचे रु. २० कोटींच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, असे श्री. डोंगरे यांनी नमूद केले. तसेच सदस्य, श्री. भरमा कांबळे यांनी विमा योजनेचे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चांगले काम झालेले असल्यामुळे त्यांनी त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवाव्यात असे नमूद केले. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती निविदा काढून झालेली असल्यामुळे आणि त्यांच्या सल्ल्याने न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कन्सल्टंट L & G

आणि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनीने दिलेल्या सुधारीत रु. २० कोटींच्या प्रस्तावानुसार पुढील ३ वर्षांच्या कालावधीसाठी मान्यता देण्यात येत आहे असे बहुमताने ठरले.

(३) कामगार आयुक्त यांनी नियम ३५ मध्ये सुधारणा करण्याबाबत कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, कामगार आयुक्त हे मंडळाचे पदसिध्द (Ex-Officio) अध्यक्ष आहेत तसेच शासकीय सदस्य हे मंडळाचे पदसिध्द (Ex-Officio) सदस्य आहेत. जोपर्यंत असे अधिकारी सदर पद धारण करतात तोपर्यंत ते मंडळाचे पदसिध्द (Ex-Officio) अध्यक्ष व पदसिध्द (Ex-Officio) सदस्य आहेत. अशा प्रकारची धारणा शासनाने स्पष्ट केलेली आहे. त्यामुळे नियम ३५ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

तसेच, कामगार आयुक्त यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम-२००८ च्या कलम १४ अन्वये तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम-२०१३ मधील नियम-३ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"**३. सदस्यांची पदावधी** - (१) अधिनियमाच्या कलम (६) अन्वये गठित केलेल्या मंडळाचा पदसिध्द सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरीता पद धारण करतील.

परंतु, राज्य शासनास, कारणे लेखी नोंदवून आदेशाद्वारे, अशा कोणत्याही सदस्याचा किंवा सदस्यांचा कालावधी कमी करता येईल."

याच धर्तीवर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मधील नियम-३५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रस्तावित नियम-३५ खालीलप्रमाणे :-**

**नियम ३५ : सदस्यांचा पदावधी** - अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) अन्वये गठीत केलेल्या मंडळाच्या पदसिध्द सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरीता पद धारण करतील.

परंतु, राज्य शासनास, कारणे लेखी नोंदवून आदेशाद्वारे, अशा कोणत्याही सदस्याचा किंवा सदस्यांचा कालावधी कमी करता येईल. वरीलप्रमाणे नियम ३५ मध्ये दुरुस्ती करण्यात यावी असे ठरले.

बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न बघता तज्ञ समितीच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त करण्यात आली.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

सदस्य सचिव,
इमारत व इतर बांधकाम कामगार
(रोजगार नियमन व सेवाशर्ती)
अधिनियम, १९९६ अंतर्गत तज्ञ समिती

मा. मंत्री (कामगार)
इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार
नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत तज्ञ समिती

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीची दि.८.१०.२०१३ रोजी दु. १.३० वा. संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

दिनांक ८.१०.२०१३ रोजी दु. १.३० वाजता मा.मंत्री (कामगार), महाराष्ट्र रा मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाश अधिनियम, १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील मान उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हसन मुश्रीफ | - | मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, तज्ञ समिती |
| २. | श्री. राजेंद्र गावीत | - | मा.राज्यमंत्री (कामगार) तथा उपाध्यक्ष तज्ञ समिती |
| ३. | श्री. अरविंद कुमार | - | मा.प्रधान सचिव (कामगार), महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा सदस्य, तज्ञ समिती |
| ४. | श्री. मधुकर गायकवाड | - | मा.कामगार आयुक्त, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ५. | श्री. बाळासाहेब कोळसे | - | मा. सह सचिव (कामगार) |
| ६. | श्री. भू.मु.गुरव | - | मा.सह सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ७. | श्री.विलास मोरे | - | मा.संचालक, औद्योगिक सुरक्षा व आ संचालनालय तथा सदस्य, तज्ञ समिती |
| ८. | श्री. दादाराव डोंगरे | - | मा. सदस्य, तज्ञ समिती |

प्रस्ताव पाठवावा असे सुचविले असता मा.कामगार आयुक्त यांनी असा प्रस्ताव ...चे सांगितले.

... डोंगरे यांनी मंडळासाठी जी ५६ पदे मंजूर झालेली आहेत ती भरण्याबाबत सुचविले. ...यांनी सचिव (कामगार) यांनी सामान्य प्रशासन विभागाने रिक्त पदापैकी फक्त ३% पदे ...याचे आदेश दिलेले असून त्यापेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास कारणमीमांसेसह सामान्य ...न विभागाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे मंडळावरील मंजूर पदे ...नियुक्तीने भरावीत असे स्पष्ट केले.

मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी यापुढे नवीन योजना आखण्याऐवजी सध्या मंडळाच्या ज्या ...नी आहेत त्या जास्तीत जास्त कामगारांपर्यंत पोहोचवून त्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रीत ...रावे असे स्पष्ट केले. जनश्री विमा योजनेचे फायदे अत्यल्प प्रमाणात कामगारांपर्यंत ...पोहोचल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जनश्री विमा योजना पुन्हा लागू करण्यात येवू नये असे ...स्पष्ट केले.

मा.कामगार आयुक्त यांनी तज्ञ समितीच्या सदस्यांच्या भत्त्याबाबतचा विषय सभासदांसमोर ...ला व याबाबत असलेल्या शासन आदेशाप्रमाणे भत्ते देता येतील असे सांगितले. श्री. गुरव ...नी त्याप्रमाणे नियम प्रस्तावित करावेत असे सुचविले. तज्ञ समितीच्या सदस्यांना ओळखपत्र ...देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता आवश्यक असल्याचे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी तसा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा असे सांगितले. श्री. डोंगरे यांनी मंडळाच्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी कालावधी निश्चित करावा अशी सूचना केली. मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळ नवीन असल्यामुळे सध्या असा कालावधी निश्चित करणे उचित होणार नाही. मंडळास यासाठी अधिक कालावधी द्यावा व त्यानंतर यावर विचार करता येईल असे सुचविले. मा.कामगार आयुक्त यांनी टास्कफोर्स नेमण्याबाबतचा विषय सदस्यांपुढे मांडून असे विशद केले की, असा टास्कफोर्स दिल्ली राज्यात कार्यरत आहे. दिल्ली राज्य हे एका शहरापुरते मर्यादित असून महाराष्ट्र राज्याची व्याप्ती फारच मोठी असल्याने याबाबतीत असा टास्कफोर्स कसा नेमता येईल याबाबत विचार व्हावा. मा.सह सचिव (कामगार) यांनी हे काम जिल्हा सल्लागार समितीकडे सोपवावे असे सुचविले. मा.अध्यक्ष यांनी ही समिती उपकर भरला जातो की